## माझे स्वत:चे गोष्टीचे पुस्तक!




आपल्या सर्वांना गोष्टींची पुस्तके वाचायला नक्की आवडत असेल, हो ना! त्या पुस्तकांमध्ये काही खूप विनोदी गोष्टी असतात, काही गोष्टी सुपर हिरोच्या असतात तर काही जादूच्या गोष्टी  पण असतात. त्यात खूप रंगीत चित्रे असतात आणि खरं तर त्या चित्रांमुळेच आपल्याला त्या गोष्टी वाचायला आवडत शिवाय चित्रांमुळेच त्या गोष्टी आपल्याला समजायला देखील सोप्प जातं, हो ना?

तुम्ही आतापर्यंत कोणकोणती गोष्टींची पुस्तके वाचली आहेत? तुमचं सर्वात आवडतं गोष्टींचं पुस्तक कोणतं? तुम्ही गोष्टींच्या पुस्तकात चिंटू, छोटा भीम, शक्तिमान, सुपरमॅन असे वेगवेगळे सुपरहिरो पहिले असतील. त्यांपैकी तुमचा आवडता सुपरहिरो कोणता आहे? तुम्हालापण अशाच सुपरहिरो सारख्या शक्ती भेटाव्यात असे तुम्हाला वाटत असेल ना? जर तुम्हाला पण अशाच सुपर हिरो सारख्या शक्ती भेटल्या तर तुम्ही कोणकोणती चांगली कामे करणार आहात?

आता आपण असं समजू कि तुम्हाला तुमच्या इच्छेप्रमाणे शक्ती मिळाली आहे, तर मग आता तुम्ही कोणकोणत्या चांगल्या गोष्टी करणार आहात यावर एकदा विचार करा. कारण आपल्याला आता आपल्या स्वतःचे एक छान छान गोष्टीचे पुस्तक तयार करायचे आहे. आणि त्या पुस्तकात इतर कोणी सुपरहिरो असण्यापेक्षा तुम्ही स्वतः हिरो झालात तर जास्त छान वाटेल, हो ना? आणि जर तुम्हाला तुमचा आवडता एखादा जुना सुपरहिरो तुमच्या पुस्तकात घेयचा असेल तरीही  नाहीये बरं का.



अशा सुपरहिरोचं एक छानसं गोष्टींचं पुस्तक बनविण्यासाठी आपल्याला एक पेन, पेन्सिल, खोडरबर, एक कोरी वही आणि काही कलर पेन लागणार आहेत. सर्वात पहिल्यांदा आपल्याला हे ठरवायचं आहे कि आपल्या सुपरहिरो नेमकं कोणत्या गोष्टींवर काम करणार आहे? म्हणजे तो दयाळूपणा, स्वच्छता, प्लास्टिक बंदी, लोकांची काळजी घेणारा, पर्यावरणाचे रक्षण करणारा अशा कोणत्याही गोष्टींवर काम करणारा असू शकतो. एकदा का हि गोष्ट ठरली कीं मग पुढे आपल्याला आपल्या सुपरहिरो च रूप ठरवायचं आहे. म्हणजे तो कसा दिसतो? त्याचे कपडे कसे आहेत? त्याच्या कपड्यांचा रंग कसा आहे? तो तोंडावर कसा मास्क घालतो वगैरे गोष्टी आपल्याला नीट विचार एका कागदावर काढायच्या आहेत. एकदा का आपल्या सुपरहिरो च रूप तयार

झालं कि मग आपण आपल्या गोष्टीला सुरुवात करू शकतो. खाली नमुन्यादाखल आपण एक चित्र दिलेलं आहे, वाटल्यास तुम्ही त्याला अजून डिजाईन करून त्यात रंग भरू शकता.

आता आपल्याला आपल्या सुपरहीरोची एक गोष्ट तयार करायची आहे. आधी आपण आपण आपल्या हिरो ची थोडीशी माहिती देऊया. म्हणजे तो कुठे राहतो, त्याचा उद्देश काय आहे, आणि तो या गोष्टीत कशावर काम करणार आहे? अशी गोष्ट तयार करण्यासाठी आपल्याला अशी एखादी दुसरी गोष्ट वाचून पाहावी लागेल म्हणजे त्या गोष्टीत किती माणसे आहेत, किती चित्र आहेत, त्यांचे वाक्य कसे लिहिले आहे हे आपल्याला समजेल.




प्रथम आपण आपल्या गोष्टीत किती माणसे आहेत हे लिहून काढू. जसे की

१) सुपर हिरो

२) पहिला माणूस

३) दुसरा माणूस

४) एक शत्रू  इत्यादी

आता आपण आपली गोष्ट तयार करू. त्यासाठी आपल्याला खालील काही बाबींवर विचार करणे गरजेचे आहे, जसे की

१) आपल्या गोष्टीची सुरुवात कशी होणार आहे.

२) गोष्टीतल्या माणसांवर काय संकट येणार आहे.

३) आपला सुपर हिरो त्यांना कशी मदत करणार आहे.


४) आपल्या गोष्टीचा शेवट काय होणार आहे.

५) आपल्या गोष्टीतुन इतरांना काय संदेश मिळणार आहे.

आपली गोष्ट कमीतकमी ३ पानाची असायला हवी गोष्टीचे चौकोन कोणत्याही आकाराचे असले तरी चालतील. किंवा तुम्ही त्रिकोणातून सुद्धा चित्रे दाखवू शकता. आकार कसाही ठेवा फक्त आपले पुस्तक आकर्षक दिले पाहिजे

**हे गोष्टीचे पुस्तक तयार करत असताना विद्यार्थ्यांना नाम, क्रियापद आणि विशेषण याबद्दल माहिती मिळने अपेक्षित आहे. कोणत्याही व्यक्तीचे नाव, वस्तूचे नाव, एखाद्या जागेचे नाव याला नाम असे म्हणतात. उदाहरणार्थ राम, अंबाजोगाई, बीड, कावळा, मुलगा हि नाम आहेत.  वाक्यामधील क्रिया दर्शविणाऱ्या किंवा ज्या शब्दातून वाक्यातील क्रिया दर्शविली जाते व त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होतो अशा क्रियावाचक शब्दाला क्रियापद असे म्हणतात. उदाहरणार्थ गेला, जातो, खातो, पितो इत्यादी.**

**नामाबद्दल विशेष माहिती सांगणार्या् शब्दास विशेषण असे म्हणतात. उदा. चांगली मुलगी काळा कुत्रा पाच टोप्या विशेषण – चांगली, काळा, पाच इत्यादी विशेषणे आहेत.**




आता प्रत्येक विद्यार्थ्याला आपली स्वतःची एक गोष्ट तयार करायची आहे. आधी सांगितल्याप्रमाणे तुमच्या गोष्टीमध्ये तुम्ही एखादा काल्पनिक हिरो घेऊ शकता किंवा तुम्ही स्वतः एक काल्पनिक हिरो बनवू शकता जस की एखादी जादूची परी, एखादा जीन, जादूचा घोडा, जादुई म्हातारी, जादूचा पेन, जादुई घोडा, चमत्कारी कुत्र्याचे पिल्लू, जादुई मांजराचे पिल्लू इत्यादी. एकदा का तुमचा हिरवी ठरला कि मग आपण सुरुवात करूया आपल्या गोष्टीला.


सर्वप्रथम कल्पना करा की तुमच्या गोष्टींमधून तुम्हाला नेमका काय संदेश देयचा आहे जस की एखाद्या गुंडाला अद्दल घडवणे, एखाद्या भोळ्या मुलाला मदत करणे, एखाद्या गरीब कुटुंबाला श्रीमंत करणे, एखाद्या अडचणीत आलेल्या मुलीला मदत करणे, एखाद्याचा कोणताही त्रास कमी करणे, एखाद्या वृद्ध व्यक्तीला मदत करणे इत्यादी. अशापैकी कोणताही एखादा संदेश तुमच्या मनात तयार झाल्यावर त्यावर गोष्ट तयार करणे आपल्याला सोपे जाईल. आपण एक उदाहरणादाखल गोष्ट तयार करून पाहू. समजा आपल्याला एखाद्या भोळ्या मुलाला मदत करायचीय हा आपला संदेश असेल तर आपण खालीलप्रकारे गोष्ट तयार करू शकू.

एक खूप भोळसर मुलगा होता. तो मुलगा व्यवस्थित राहत नव्हता तसेच तो त्याचे घर देखील स्वच्छ ठेवत नव्हता. त्याचे कपडे नेहमी घाणेरडे असत. त्याला प्रत्येकजण चिडवत होते तसेच त्याला नेहमी त्रास देण्याचा प्रयत्न करत होते. एकदा त्या मुलाला रस्त्यात एक कुत्र्याचे पिल्लू सापडले. त्या मुलाने त्या पिल्लाला त्याच्या घरी पाळायला आणले. त्या मुलाला माहित नव्हतं कि ते कुत्र्याचं पिल्लू जादुई आहे. सकाळी झोपेतून उठल्यावर अचानक त्याला त्याच संपूर्ण घर साफसफाई केलेलं दिसून आलं. तो दिवसभर मनामध्ये विचार करत राहिला कि आज आपलं घर नेमकं कोणी एवढं स्वच्छ करून गेलं असेल. दुसऱ्या दिवशी तो झोपेतून उठून पाहतो तर त्याच्या अंगावर एकदम नीटनेटके कपडे आले होते. ते कपडे त्याचे स्वतःचेच होते पण व्यवस्थित धुवून इस्त्री केलेले होते. आज तो एकदम हिरो सारखा दिसत होता. आज मात्र दिवसभर विचार केल्यावर त्याला कळलं की जेव्हापासून त्याने ते कुत्र्याचं पिल्लू घरात आणलं होत तेंव्हापासून त्याच्या आयुष्यात रोज छानछान बदल होत होते. आता त्याला बाहेर कोणीही चिडवत नव्हते किंवा त्रास देत नव्हते. आता त्याला कळून चुकलं होत की इतक्या दिवस आपल्या घाण सवयीमुळे लोक आपल्याला चिडवत होते आणि त्रास देत होते. मग एके दिवशी अचानक त्याच्या घरातून ते कुत्र्याचं पिल्लू गायब झालं. त्याने सर्व घर त्याला शोधण्याचा प्रयत्न केला पण त्याला ते कुठेच सापडलं नाही. पण त्याला त्याच्या भिंतीवर एक संदेश लिहिलेला दिसला. तो संदेश असा होता की, "मित्रा, आता तुला सर्व चांगल्या सवयी समजल्या आहेत. इथून पुढे तू या सर्व चांगल्या सवयी अशाच जोपासत राहा. मी तुझ्यासारख्याच

एका दुसऱ्या मुलाच्या आयुष्यात बदल करण्यासाठी निघून जात आहे, बाय बाय " त्या दिवसापासून तो मुलगा तसाच व्यवस्थित राहू लागला आणि सर्वांचा आवडता मित्र बनला.

आपण अशापद्धतीने आपली स्वतःची कोणतीही एक गोष्ट तयार करू शकतो. पण एक गोष्ट लक्षात असू द्या की आपली गोष्ट हि नुसतं लिखाण असू नये, त्यामध्ये वेवेगळी चित्रे काढून ती गोष्ट जास्तीत जास्त आकर्षक बनविण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी तुम्ही खालीलप्रकारे तुमच्या पानाची आखणी करू शकता.

**अशा आखणी मधून मुलांना त्रिकोण, चौकोन, गोलाकार, अंडाकार यांसारख्या आकारांची संपूर्ण माहिती होणे अपेक्षित आहे. तसेच एका पानावर किती आकार मावतात, आपल्या गोष्टीत एकूण किती त्रिकोण, चौकोन आहेत?, तसेच जर एका पानावर जर चार आकार बसत असतील तर ५ पानाच्या आपल्या गोष्टीत एकूण किती आकार मावू शकतील? तसेच जर आपल्याला २० आकारांची एक गोष्ट बनवायची असेल आणि आपल्याकडे फक्त चार पाने असतील तर एका पानावर किती आकार बसवावे लागतील अशा वेगवेगळ्या प्रश्नांमधून आपल्याला बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार या क्रिया त्यांना समजावून सांगता येतील. आपले बरेच विद्यार्थी गणिताच्या या पायाभूत क्रिया जरी आधीच करू शकत असले तरीही त्या क्रियांचा व्यवहारातील वापर त्यांना बहुतेकवेळी माहित नसतो. तो व्यावहारिक वापर त्यांना संपूर्ण समजणे हे देखील या उपक्रमातून समजणे अपेक्षित आहे.**



आपले गोष्टीचे पुस्तक तयार होत असताना आपल्याला आपले चित्र बोलके करण्यासाठी खालील विविध आकार वापरावे लागणार आहेत. हे विविध आकार त्या चित्रातील माणूस काय बोलतो आहे किंवा काय विचार करतो आहे हे दाखविण्यासाठी वापरतात. मुलांना अशा विविध आकाराला नंबर देण्यास सांगावे, तसेच तुम्ही एकूण किती विविध आकार वापरले आहेत? त्यातील गोल, चौकोन, अंडाकार, त्रिकोण किती आहेत? तुम्ही हा चौकोन आहे, आयात आहे किंवा त्रिकोण आहे हे नेमके कसे ओळखले? असे विविध प्रश्न विचारून त्यांना प्रत्येक आकाराची व्याख्या समजावून सांगावी. (ज्या आकाराला तीन बाजू असतात त्याला त्रिकोण असे म्हणतात. ज्या आकाराला चार समान बाजू असतात त्याला चौकोन असे म्हणतात. तसेच ज्या आकाराला चार बाजू असतात पण फक्त समोरासमोरील बाजू समान असतात त्याला आयात असे म्हणतात.)

एकदा या आकारांमधील फरक त्यांना व्यवस्थित समजला की मग आपल्या अवतीभोवती किंवा घरात अशा आकारांच्या कोणकोणत्या वस्तू आहेत याची यादी बनवायला सांगावी.

**अशाप्रकारे आपले गोष्टीचे पुस्तक तयार होईल. हे पुस्तक मुले आपल्या घरी दाखवतील. काही मुलांना चित्रे काढायला अडचणी येत असतील तर ते दुसऱ्या पुस्तकातील कात्रणे देखील कापून चिकटवू शकतात. वर सांगितल्याप्रमाणे या पुस्तकातून मुलांना विविध आकारांची माहिती तसेच नाम, क्रियापद, विशेषण याची सर्व माहिती होणे अपेक्षित आहे. या सर्व गोष्टी मुलांना अधिक समजण्यासाठी शिक्षक**

**स्वत:ची क्रियाशीलता वापरून याला अणखी वेगळ्या पद्धतीने तयार करून घेऊ शकतील. पुस्तक कमीतकमी ३ पानांचे असावे.**

